MHAH080010832024

**नि. दि. दा. क्र. ४८२/२०२४**

: **<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक ४८२/२०२४ मधील नि.क्रं.१५ वर आदेश</u>** :

१. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जास विरोध केला व कथन केले की, अर्जामध्ये दिलेले कारण खोटे आहे व सोबत कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

२. अर्जामध्ये कैफियत वेळेत दाखल न करण्याचे कारण असे की प्रतिवादी क्र.१ यांना पक्षघात झालेला आहे, तसेच प्रतिवाद क्र.२ हे गंभीर आजाराने ग्रस्त आहेत. प्रतिवादी क्र.३ हा रिक्षा चालवुन उदरनिर्वाह करतो, प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यात लेखी कैफियत देण्यास जाणीवपुर्वक उशिर केलेला नाही. सबब, लेखी कैफियत दाखल करण्यास जो काही वेळ झालेला आहे तो माफ करून प्रतिवादींस त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींचे कथनानुसार नमुद कारण हे रास्त वाटते. त्याचप्रमाणे विलंबाचा कालावधी पाहता त्याकरिता आणखी काही कागदपत्रे दाखल करणे आवश्यक वाटत नाही. सबब, न्यायाच्या हितास्तव आणि दोन्ही पक्षांमधील वाद गुणावगुणांवर संपुष्टात आणण्यासाठी प्रतिवादींचा लेखी कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक दिसुन येते. सबब सदर प्रतिवादींचा लेखी कैफियत फैलावर घेवून दावा गुणावगुणांवर निकाली काढणे न्यायाच्या हितास्तव आहे. परंतु प्रतिवादींना निश्चितच विलंब झाला असल्यामुळे अर्ज खालील आदेशाप्रमाणे खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**: आ दे श :**

१.	अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादींना रक्कम रुपये ५००/— देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२.	खर्च दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची लेखी कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३.	अर्जाचा खर्च अर्जदारांवर ठेवण्यात येतो.

Digitally signed by
CHANDRADIP
PRAVINCHANDRA
RAGHUVANSHI
Date: 2025.06.16
19:10:58 +0530

संगमनेर						(चं. प्र. रघुवंशी)
दिनांक : १६.०६.२०२५.			६ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
संगमनेर.